**नियमित दिवाणी मुकदमा नंबर २९७/२०२३ मधील निशाणी क्र.४७ खालील आदेश**

(गौरी शशिकांत कदम + १विरुध्द परशुराम केशव कदम + ६)

(CNR No.MHST130009502023)

०१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ३९ क्रम १ व २ व कलम १५१ प्रमाणे स्थगिती अर्ज व मनाई अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जावर प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी नि.क्र.५० वर म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी नि.क्र.५२ वर पुरशिस दाखल करुन प्रतिवादी क्रमांक ७ चे नि.क्र.४४ब वरील म्हणणे व कैफियत सदर अर्जास म्हणणे वाचणेत यावे म्हणून पुरशिस दाखल करुन सदर अर्जास आक्षेप घेतला आहे.

०२. वादीने सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्रमांक २ सुशिला परशुराम कदम यांच्या नावावर मालमत्ता क्रमांक ७२० चे खरेदीपत्र असल्याने व प्रतिवादी क्रमांक ५ विरुध्द सदर मालमत्तेचे कर्ज प्रकरण असल्याने व प्रतिवादी क्रमांक ७ सदर मालमत्ता लिलाव करुन विक्री करण्याच्या तयारीत आहे. त्याकरीता प्रतिवादी क्रमांक २, ५ व ७ विरुध्द स्थगिती आदेश पारित होणे गरजेचे आहे, असे कथन केले आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ७ यांनी मालमत्तेची कोणत्याही प्रकारे गहाण, विक्री, खरेदीपत्र, बक्षिसपत्र, बोजा चढवू नये किंवा कोणताही फेरबदल करु नये, याकरीता नि.क्र.०५ वरील अर्जाप्रमाणे ताकीद देणेत येवून तात्पुता मनाई हुकूम पारित व्हावा व प्रतिवादी क्रमांक २, ५ व ७ यांच्या विरुध्द स्थगिती आदेश पारित व्हावा, अशी विनंती केली आहे.

०३. वादी विधीज्ञ श्रीमती गौरी कदम व प्रतिवादी क्रमांक १ ते ५ तर्फे विधीज्ञ श्री. आर. जे. झांझुर्णे व श्री. एस. जे. घाडगे व प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कोळेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांचा नि.क्र.४४ वरील अर्ज गुणावगुणावर निश्चित करणेत आलेला आहे व आदेश पारित करणेत आलेला आहे. नि.क्र.४४ अर्जावरील कारणमिमांसेनुसार, *''बँकेने दावा कलम १क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० वर तारण गहाण ६१९/२०१८ ची प्रत दाखल केलेली आहे. तसेच, दावा कलम १ क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० च्या गाव नमुना आठ*

*यावर प्रतिवादी क्रमांक ७ यांचे बोजा चढवल्याचे दिसून येत आहे. Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) चे कलम ३४ नुसार दिवाणी न्यायालयाला अधिकारक्षेत्राची बाधा येते. तसेच, प्रतिवादी क्रमांक ७ यांनी Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) या कायदया अंतर्गत कारवाई सुरु केली असल्याचे दिसून येत आहे. SARFAESI ACT 2002 अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांना कायदेशिर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वर नमूद दाखल केलेले केस लॉ मधील गृहितके सदर प्रकरणाला लागू होत असल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११ (ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र फक्त प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणे न्यायोचित होणार आहे''.*

०५. नि.क्र.४४ वरील आदेशानुसार, ''प्रतिवादी क्रमांक ७ चा नि.क्र.४४ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो व दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११(ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणेत येते'', असा आदेश पारित केला आहे.

०६. नि.क्र.४४ वरील कारणमिमांसा व आदेशानुसार वादीचा सदरचा नि.क्र.४७ वरील स्थगिती व मनाई हुकूम अर्ज फेटाळणेत येतो. त्याकरीता आदेश –

**<u>आदेश</u>**

१. वादीचा तुर्तातुर्त (तात्पुरता) ताकीदीचा अर्ज व स्थगिती अर्ज निशाणी ४७ नामंजुर करण्यात येतो. (फेटाळण्यात येतो).

पाटण, जिल्हा सातारा. (चेतना य. नेवारे)

दि.१०.०४.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,पाटण